गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेली उच्चाधिकार समिती रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. पीएलएन २०१७/(१७२/०७१७)/निवसं-१
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १८ मे, २०१८.

वाचा : शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. पीएलएन २००९/(९९/०९)/निवसं-१ दि.०२/०३/२०१०.

प्रस्तावना :-

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प विहित कालावधीत कालबद्ध रीतीने पूर्ण होण्यासाठी, प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी १) उच्चाधिकार समिती, २) राज्यस्तरीय समिती व ३) महामंडळस्तरीय समिती अशा ३ समित्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आल्या होत्या.

गोसीखुर्द प्रकल्पाचा सन २०१५-१६ मध्ये प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये (PMKSY) समावेश करण्यात आला असून प्रधान सचिव स्तरावर नियमित प्रकल्पाचा आढावा घेण्यात येतो. सन २०१५ पासून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली वॉर रुम मध्ये तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मान्यता समिती (State Level Sanctioning Committee) मध्ये सुद्धा गोसीखुर्द प्रकल्पाचा नियमीत आढावा घेण्यात येतो. त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने पुन्हा आढावा घेण्याची आवश्यकता नसल्याने सदर उच्चाधिकार समिती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प विहित कालावधीत कालबद्ध रीतीने पूर्ण होण्यासाठी, प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ०२/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेली उच्चाधिकार समिती या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१८१७०६४९३५२७ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Madhukar Belsare

Digitally signed by Sanjay Madhukar Belsare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=544e07f06fbab100dc2bfe33db79fc14350d78d6c16f8feab484d842c496717d, cn=Sanjay Madhukar Belsare
Date: 2018.05.18 17:05:00 +05'30'

(डॉ. संजय बेलसरे)
शासनाचे उपसचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री,जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) अ.मु.स.(वित्त), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) अ.मु.स.(नियोजन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७) अ.मु.स.(महसूल), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) अ.मु.स.(मदत व पुनर्वसन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९) अ.मु.स.(कृषी), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव(जलसंपदा), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११) सचिव(लाक्षेवि), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव(प्रकल्प समन्वय), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१३) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१४) मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.
१५) आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.
१६) अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर.
१७) अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, आंबाडी.
१८) उप सचिव (निवसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.
१९) कार्यासन निवसं १ संग्रहार्थ.